


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

गुरुवार, दि.२२ जानेवारी २०२६ । पान ९





# नवा महापौर मिळणार फेब्रुवारी महिन्यात



## स्वीकृत सदस्यांची निवड मार्च महिन्यात होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

महापौरपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया होण्यास दहा ते बारा दिवस लागणार असून फेब्रुवारी महिन्यातील पहिल्या आठवड्यात सोलापूर महापालिकेला नवा महापौर मिळेल, अशी शक्यता नगरसचिव प्रविण दंतकाळे यांनी व्यक्त केली.

महापालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला ८७ जागा मिळाल्या आहेत. विरोधी पक्षांना पंधरा जागा मिळाल्या असून यामध्ये एमआयएमला आठ, शिवसेनेला चार, काँग्रेसला दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एक जागेचा समावेश आहे. भाजपा सर्वात मोठा पक्ष आहे. सत्ता स्थापन करण्यासाठी ५२ सदस्यांची गरज आहे. भाजपाकडे ८७ सदस्य आहेत. त्यामुळे बहुमत असलेल्या याच पक्षाचा महापौर होणार हे स्पष्ट आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर महापौर आणि उपमहापौर निवडीची प्रक्रिया सुरु होईल. महापालिका आयुक्त आणि विभागीय आयुक्त यांच्याशी चर्चा करून ही प्रक्रिया पार पाडण्यात येईल. यासाठी दहा ते बारा दिवस लागतील. त्यामुळे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात महापालिका सभेत महापौर तसेच उपम हापौर यांची निवड होईल, असेही दंतकाळे यांनी सांगितले. महापौर तसेच उप महापौर यांची निवडणूक पार पडल्यानंतर महापौरांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती तसेच परिवहन समिती सदस्यांची निवड केली जाईल. राजकीय पक्षाचे सभागृहातील नेते आपापल्या सदस्यांची नावे महापौरांकडे देतील.

त्यानंतर अधिकृत घोषणा केली जाईल, असेही दंतकाळे यांनी सांगितले. या दोन्ही समिती सभापतींच्या सभापती निवडीची प्रक्रिया नंतर स्वतंत्र बैठक घेऊन पुर्ण करण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले. स्वीकृत सदस्य संख्येत वाढ झाली आहे. गेल्या वेळी पाच होती. यावेळी दहाजणांना संधी मिळेल. या निवडीची प्रक्रिया सर्वसाधारण सभेतच करता येते. त्यामुळे मार्च महिन्यात ही प्रक्रिया पुर्ण होईल, असेही दंतकाळे यांनी सांगितले.

### नगरसचिव विभागाकडे ५७ कर्मचारी पूर्ववत येणार

महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता यांच्या कार्यालयाची स्वच्छता आणि सजावट करण्यात येत असुन दोन चार दिवसात काम पुर्ण होईल. या सर्व पदाधिकाऱ्यांना महापालिकेचे वाहन देण्यात येईल. नगरसचिव विभागाकडील ५७ मचारी प्रशासकीय काळात अन्य विभागात पाठवले असून आता पुन्हा ते पुर्वीप्रमाणे आमच्याकडे येतील. आणखी काही रिक्त जागा आहेत, त्यादेखील भरुन देण्याची मागणी केली आहे, अशी माहिती महापालिका नगर सचिव प्रवीण दंतकाळे यांनी दिली.









# श्री मार्कंडेय महामुनींचा जन्मोत्सव भक्तीभावात

## श्रींचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मांदियाळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनी यांच्या जन्मोत्सवानिमित्त पद्मशाली ज्ञाती संस्थेच्यावतीने तसेच पूर्व भागातील विविध संघटनातर्फे बुधवारी विविध कार्यक्रम घेण्यात आले. सिद्धेश्वर पेठेतील श्री मार्कंडेय मंदिरात मुख्य कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी सहा वाजता मूळमूर्तीला उद्योजक सिद्धेश्वर गड्डम यांच्या हस्ते महारूद्राभिषेक करण्यात आला. तदनंतर ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांच्या हस्ते मंदिरावर पद्मध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मंदिर परिसर सुवासिक तसेच रंगबिरंगी फुलांनी सजवण्यात आल्याने सरा मंदिर परिसर चैतन्याने न्हाऊन गेला होता.

प्रभाकर बुरा आणि जयश्री बुरा यांच्या हस्ते होमहवन करण्यात आल्यानंतर दहा वाजता पालखी पूजन करून पालखी प्रदक्षिणा करण्यात आली. मंदिरातील सर्व विधी पद्मशाली पुरोहित संघातर्फे अध्यक्ष श्रीनिवास म्याडम, सचिव आत्म राम चिप्पा, मंदिराचे पुरोहित राघवेंद्र आरकाल तसेच सहकाऱ्यांनी केले. जन्मोत्सवानिमित्ताने १४ जानेवारीपासून श्री मार्कंडेयरचित दुर्गासप्तशती ग्रंथाच्या सामूहिक पारायणाला सुरुवात झाली. तसेच समाजातील काही युवकांनी ११ जानेवारीपासून मार्कंडेय दीक्षा घेतली. त्यांचे व्रतही सुरू झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष महांकाळी येलदी, सरचिटणीस संतोष सोमा आदी पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, श्रींचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच मंदिरात अबालवृद्ध भाविकांनी गर्दी केली होती. भाविकांची रांग मंदिराबाहेर गेली होती. शिस्तबद्ध पद्धतीने भाविकांनी दर्शन घेतले. यावेळी भाविकांकडून जय मार्कंडेयचा नारा घुमला. पूर्व भागातील विविध संस्था संघटनांकडून चौकाचौकाम ध्ये मार्कंडेय प्रतिमा तसेच मूर्ती प्रतिष्ठापना करून जन्मोत्सवाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी 'जय..जय..मार्कंडेया... मुनीवरा' हे भक्तीगीत लावण्यात आले होते. जन्मोत्सव निमित्त घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांमुळे सारा पूर्व भाग मार्कंडेयमय झाल्याचे चित्र दिसून आले.



सोलापूर : जय मार्कंडेय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने आंध्रा दत्त चौक परिसरात बुधवारी श्री महर्षी मार्कंडेय जन्मोत्सवाचा देखावा उभा केला आहे

# विवाहितेचा छळ; पोलिसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

एमआयडीसी पोलीस ठाण्यात विवाहितेचा मानपान न केल्याचा आरोप करत घरबांधणीसाठी दहा लाख रुपयांची मागणी करून मारहाण व शिवीगाळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या तिघांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना दि. ६ मे २०२४ ते २१ एप्रिल २०२५ या कालावधीत विनायक नगर, सोलापूर येथे घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यावेळी गुन्ह्याची नोंद दि. १९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ९.१४ वाजता करण्यात आली.

फिर्यादी नवनिता नागेश कल्याणम वय २१, रा. ४१५, विनायक नगर, सोलापूर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी नागेश (पती), राज्वा (सासू) व लता (नणंद) यांनी एकत्र येऊन लग्नात मानपान केला नाही, अशा कारणावरून घरगुती वाद घालत घर बांधण्यासाठी दहा लाख रुपये घेऊन ये, अशी मागणी केली. तसेच हाताने मारहाण करून अर्वाच्च शिवीगाळ केली व उलट उत्तर दिल्यास घरातून हाकलून देण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणाचा तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार करत आहेत. पुढील तपास सुरू असून पोलिसांकडून संबंधितांची चौकशी करण्यात येत आहे.





# सोलापूरच्या दोन कलाकारांचे मुंबईत भरले कला प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सोलापूरचे प्रसिद्ध चित्रकार प्रवीण रणदिवे आणि शिल्पकार महेश हलशेट्टी यांच्या कलाकृतींचे संयुक्त कला प्रदर्शन मुंबईतील वरळी येथील नेहरू सेंटर आर्ट गॅलरी येथे आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन २० ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत भरवले जाणार आहे.

या प्रदर्शनात प्रवीण रणदिवे यांची २० चित्रे तर महेश हलशेट्टी यांची १४ शिल्पे मांडण्यात येणार आहेत. प्रवीण रणदिवे यांनी त्यांच्या खास मोजॅक शैलीत व मिश्र माध्यमातून सोलापुरी चादर, बिबट्या, निसर्ग व मनुष्य यांचे नाते, तसेच पाण्यातील जीवन अशा विविध विषयांवर चित्रनिर्मिती केली आहे. नेहरू सेंटर आर्ट गॅलरीतील हे त्यांचे दुसरे प्रदर्शन असून यापूर्वी मुंबई, पुणे, बंगळुरू व अहमदाबाद येथेही त्यांच्या चित्रप्रदर्शनांचे आयोजन झाले आहे. शिल्पकार महेश हलशेट्टी यांनी दगड, लाकूड, धातू व फायबर अशा विविध माध्यमांतून साकारलेली शिल्पे सादर केली असून, त्यांचे विषय मानवी दैनंदिन जीवनातील प्रसंगांवर आधारित आहेत. हे प्रदर्शन सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार असून, कला रसिकांसाठी ही एक महत्त्वाची संधी ठरणार आहे.

# पालिका निवडणुकीत जागांमध्ये भाजप अव्वल

## दोन नंबरच्या मतांमुळे वाढले शिवसेनेचे राजकीय वजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सोलापूर महापालिकेत भाजपने ८७ जागांसह निर्विवाद वर्चस्व मिळवले आहे. २६ प्रभागांपैकी तब्बल ९ प्रभागांत एकूण दुसऱ्या क्रमांकाच्या मतांत शिवसेना(शिंदे गट) पुढे आहे. यामुळे शिवसेना 'दुसऱ्या क्रमांकाचा प्रमुख पक्ष' म्हणून पुढे आली आहे.जागांमध्ये भाजप अव्वल आहे तर मतांच्या गणितात शिवसेनेला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. सोलापूरच्या राजकारणात बदलत्या समीकरणांचा स्पष्ट संदेश दिला आहे.



सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीतील निकाल पाहता भारतीय जनता पार्टीने महाविजय संपादन केला. या निवडणुकीत १०२ जागांसाठी एकूण ५६४ उमेदवार रिंगणात होते. भाजपाने स्वबळावर १०२ जागा लढविल्या. महायुती अंतर्गत असलेल्या शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांनी युती केली. तर महाविकास आघाडी अंतर्गत काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, माकप, मनसे यांनी निवडणूक लढविली. या निवडणुकीत महापालिका पक्षनिहाय बलाबल याप्रमाणे - भाजपा ८७, एमआयएम ८, शिवसेना (शिंदे गट) ४, काँग्रेस २, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) १ आहे. दरम्यान, महायुती फिसकटल्याने भाजपला थेट आव्हान काँग्रेस किंवा एमआयएमकडून नव्हे, तर मित्रपक्ष शिवसेनेकडूनच मिळाले. अनेक प्रभागांत थेट लढत भाजप-शिवसेना अशी झाली. हे शहरातील राजकीय प्रवाह बदलत असल्याचे सूचक आहे. भाजपकडून तिकीट न मिळालेल्या, तसेच 'हिंदुत्व व राष्ट्रीयत्व' या मुद्द्यांवर ठाम असलेल्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा मार्ग स्वीकारला. निकालात त्यांना यश मिळाले नसले, तरी मतांच्या टक्केवारीतून नाराजीचा सूर स्पष्टपणे उमटला आहे.

### विरोधकांची विखुरलेली ताकद

राष्ट्रवादी काँग्रेस (५ प्रभाग), काँग्रेस (५ प्रभाग) आणि एमआयएम (३) हे पक्ष दुसऱ्या क्रमांकापुरतेच मर्यादित राहिले. संघटित पर्याय उभा न राहिल्याने भाजपविरोधी मते एकत्र येऊ शकली नाहीत. मतांच्या पातळीवर शिवसेनेची उपस्थिती दुर्लक्षित करता येणार नाही. आगामी काळात भाजपमधील नाराज गटासाठी शिवसेना 'हिंदुत्ववादी पर्याय' ठरू शकते, हा निकालाचा सर्वात महत्त्वाचा राजकीय संदेश आहे.

| दुसऱ्या क्रमांकावर राहिले पक्ष आणि प्रभाग असे | |
|---|---|
| शिवसेना शिंदे गट | प्रभाग २, ३, ६, ११, १२, १८, १९, २३, २४. |
| राष्ट्रबादी अजित पवार गट | प्रभाग ४, ५, ८, २०, २५. |
| काँग्रेस | प्रभाग १२, १४, १५, २१, २६. |
| एमआयएम | प्रभाग १६,१७, २२. |
| अपक्ष | प्रभाग ९, १०. |
| माकप | प्रभाग १३. |
| वंचित | प्रभाग १ |




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३३४

**जय जय आचार्या । समस्त सुर वर्या ।**
**प्रज्ञा प्रभात सुर्या । सुखोदया ।।**

प्रकृतिपुरूष विवेक योगाबद्दल बोलुन संपल्यानंतर आता भगवंत गुणातीत योगाबद्दल बोलत आहेत भगवंतांचा हा उपदेश संस्कृत भाषेत व मोजक्या शब्दात चालु आहे, हा उपदेश मराठी भाषेतुन व सर्वसामान्यांना समजेल अशा पध्दतीने उदाहरणासह सांगणे तसे अत्यंत अवघड काम आहे, पण असे अवघड काम सद्गुरूंची कृपा असेल तर सहज शक्य असल्याचे माऊलींवरील निवृत्तीनाथांच्या कृपेवरून दिसुन येते. आपल्यावर सद्गुरूंची कृपा नसती तर आपण हे गीताख्य एवढ्या विस्ताराने व मायबोलीत सांगुच शकलो नसतो, असे माऊली अनेक ठिकाणी म्हणतात. आपले गुरू हे सर्वश्रेष्ठ असुन ते कृपावंत असल्याचे सांगतांना माऊली म्हणतात, जय जय आचार्या । समस्त सुर वर्या । प्रज्ञा प्रभात सुर्या । सुखोदया ।। अर्थात, हे आचार्य, गुरूदेवा मी आपला जयजयकार करतो. सर्व देवांत तुम्ही श्रेष्ठ आहात: ज्ञानाची पहाट करणारा आपण सुर्य आहात आणि सुखाची सुरूवात तुमच्यापासुन होते, असे माऊली म्हणतात. आपले सद्गुरू हे विश्वाचे विश्रांतीस्थळ आहेत. आत्मभावनेचा साक्षात्कार करून देण्याची ताकत आपल्या सद्गुरूत आहे, असेही माऊली म्हणतात. आपल्या सद्गुरूंची स्तुती करेल तेवढी कमीच आहे कारण सद्गुरूंच्या सामर्थ्यांपुढे त्यांची स्तुती करण्यासाठी शब्द कमी पडतात. त्यामुळे सद्गुरूंची स्तुती करण्याचा हव्यास टाकुन समाधानाने सद्गुरूंचे चरणी माथा ठेवावा यातच खरे मोठेपण आहे, असेही माऊलींना वाटते. क्षेत्र, क्षेत्रज्ञ, ज्ञान, ज्ञेय, अज्ञान असे अवघड विषय ब्रम्हरुपाचे ज्ञान होण्यसाठी वेगवेगळे करून भगवंतांनी अर्जुनाला सांगीतले. हे सर्व अवघड असले तरी केवळ सद्गुरूंची कृपा असल्यामुळेच आपण सोप्या, सरळ भाषेत श्रोत्यांना पाहीजे तसे देऊ शकत असल्याचे माऊली म्हणतात.



खरे म्हणजे सद्गुरू भेटणे ही बाब अत्यंत अवघड आहे. ज्याला सद्गुरू भेटला त्याच्याइतका भाग्यशाली कोणी असत नाही. आपले मनोरथ पुर्ण करण्याचे, आपणाला योग्य ते मार्गदर्शन करून योग्य मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य केवळ सदगुरूमध्ये असते. योगायोगाने सद्गुरू भेटले तरी, त्यांची सेवा करायलाही भाग्य लागते. सेवेसाठी शिष्याकडे अत्यंत नम्रपणा असायला हवा. लिनता, सेवा, कष्ट, नम्रता या सर्व बाबी सद्गुरूला प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक असतात. सद्गुरू आपणांला आपल्या जीवनाचे महत्व पटवुन देऊ शकतात. मानवाला स्वत:चा परीचय होणे अत्यंत आवश्यक आहे. हा परीचय ज्याचा त्याला होत नसतो. पण हा परीचय सद्गुरू सहज करून देऊ शकतात. सर्व संत महात्म्यांनी स्वत:ला सद्गुरू करून घेतले होते, म्हणूनच ते समाजासाठी काहीतरी करू शकल्याचे अनेक संत महात्मे सांगतात. संत, महात्म्यांनी जसा सद्गुरू करून घेतला, तसे आपणही सद्गुरू करून घ्यायला हवा. सद्गुरू मिळणे अवघड असले तरी अशक्य नाही हे पण लक्षात ठेवावे. श्री ज्ञानेश्वर माऊली ज्ञानेश्वरीच्या माध्यमाने आपण मार्गदर्शन करीतच आहेत. त्यामुळे त्यांनाच सद्गुरू मानून त्यांच्या ओव्याच्या सहवासात राहीलो तरी आपणाला क्षेत्र, क्षेत्रज्ञ, ज्ञेय, अज्ञान हे विषय समजून ब्रम्हरूपाचे ज्ञान होऊ शकेल. जय जय राम कृष्ण हरी।

**.- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ शु. चतुर्थी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- शततारका (१४.२६)**
**योग - वरियान (१७.३७)**
**करण - वणिज (१४.४०)**
**राहू काल : गुरुवार दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष : १८९७: नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म. (मृत्यू: १८ ऑगस्ट १९४५ - फोर्मोसा, तैवान)**
**१८९८: गायक व संगीतशिक्षक पं. शंकरराव व्यास यांचा जन्म. (मृत्यू: १७ डिसेंबर १९५६)**
**१९१५: उद्योगपती, जमनालाल बजाज यांचे चिरंजीव कमलनयन बजाज यांचा जन्म. (मृत्यू: १ मे १९७२).**

# शनिवारी रिंगण व पालखी प्रस्थान सोहळा

### हभप सुधाकर महाराज इंगळे यांची माहिती; माघवारीनिमित्त सोलापुरात आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

पंढरीच्या माघवारीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या श्री क्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहेत. वारकरी परंपरेचा अविभाज्य भाग असलेली माघवारी गेली २०० वर्षांहून अधिक काळ निष्ठेने जपली जात असून शनिवार दि. २४ जानेवारीला भव्य गोल रिंगण व पालखी प्रस्थान सोहळा होणार आहे, अशी माहिती अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर शहरातील ३३ दिंडया, परिसरातील २५ दिंडया आणि ५० भजनी मंडळांच्या उपस्थितीत शनिवार दि. २४ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता श्री मार्कंडेय मंदिर येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे पूजन निळोबा महाराज जांभळे व सुमंत शेळके यांच्या हस्ते तर संत तुकाराम महाराज पालखीचे पूजन पांडुरंग जगताप, नामदेव रणदिवे व भूषण जाधव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर यांच्यावतीने सर्व विणेकरी महाराजांचा सन्मान करण्यात येणार आहे.

नित्यनेम भजनानंतर पालखी प्रस्थान होऊन ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर दुपारी ४ वाजता अश्वांचा भव्य गोल रिंगण सोहळा पार पडणार आहे. अखिल भाविक वारकरी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ध्वजधारी रिंगणासह पारंपरिक रिंगणांचे आयोजन करण्यात येणार असून शेवटी अश्व रिंगण होणार आहे.



संग्रहित छायाचित्र

या सोहळ्यास हजारो भाविक उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर पालखी श्री महादेव मंदिर, साठे चाळ येथे मुक्कामी राहील. २५ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता लक्ष्मी पेठ गवळी वस्ती येथील विठ्ठल मंदिरातून तिऱ्हे मार्गे पालखी पुढे मार्गस्थ होणार आहे. माघवारीदरम्यान एकूण पाच रिंगण सोहळे होणार असून २६ जानेवारी सकाळी ९.३० वाजता मोहोळ तालुक्यातील कुरुल (पाटकर वस्ती) येथे दुसरा गोल रिंगण,२७ जानेवारी सकाळी ९.३० वाजता पेनुर (महात्मा गांधी प्रशाला) येथे तिसरा गोल रिंगण, २७ जानेवारी दुपारी ४.३० वाजता सुस्ते (श्री दत्त विद्यामंदिर) येथे चौथा गोल रिंगण, २८ जानेवारी सकाळी ९.३० वाजता पंढरपूर येथील श्री जलाराम महाराज मठासमोर पाचवा उभा रिंगण सोहळा होणार आहे. या पत्रकार परिषदेस बळीराम जांभळे, ज्योतीराम चांगभले, संजय पवार, किसन कापसे आदी उपस्थित होते.

# तुरीला कमी दर; शेतकऱ्यांकडून संताप

### उत्पादनाच्या दीडपट बाजारभाव देण्याच्या आश्वासनाची करून दिली जाते आठवण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

अतिवृष्टीमुळे यंदा उत्पादनात पन्नास टक्क्यांहून अधिक घट होऊनही सध्या तुरीचे बाजारभाव सरकारने जाहीर केलेल्या आधारभूत किमतीपेक्षा कमी म्हणजे ६४०० ते ७२०० रुपये प्रतिक्विंटलने विक्री होत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. सरकारने तुरीला ७५०० रुपये किमान आधारभूत किंमत जाहीर केली आहे. शेतकऱ्यांना उत्पादनाच्या दीडपट बाजारभाव मिळवून देऊ, अशी वल्गना करणाऱ्या सरकारविरुध्द तूर उत्पादक शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त होत आहे.

देशभरात सोलापूर, लातूर, धाराशिव, जालना, बीड, रायचूर, कलबुरगी, विजयपूर, बिदर या परिसरात मोठ्या प्रमाणात तुरीचे उत्पादन घेतले जाते. त्यामुळे सोलापूर, लातूर, बार्शीसारख्या ठिकाणी डाळ गिरण्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. येथील तुरीच्या डाळीला संपूर्ण देशभरात मागणी असते. या सर्व पार्श्वभूमीवर यंदा अतिवृष्टीमुळे तूर उत्पादनात ५० टक्क्यांहून अधिक घट झाली आहे. सध्या तुरीची काढणी अंतिम टप्प्यात आहे. एकीकडे अतिवृष्टीमुळे उत्पादनात घट आणि दुसरीकडे बाजारभाव नसल्याने तूर उत्पादक शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे.



सध्याचा बाजारभाव विचारात घेतल्यास उत्पादन खर्चही निघत नाही. सरकारी खरेदी केंद्रही सर्वत्र सुरू नाहीत. आर्थिक अडचणीमुळे शासनाच्या खरेदी केंद्राची वाट न पाहता मिळेल त्या दरात व्यापाऱ्यांना तूर विकण्याशिवाय पर्याय नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील शेतकऱ्यांना डाळवर्गीय पिकाचे उत्पादन घेण्याचे आवाहन केले होते. पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शेतकरी तुरीचे उत्पादन घेत आहेत. दुसरीकडे सरकारकडून परदेशातून तुरीची आयात केली जात आहे. अद्याप केंद्र शासनाकडे सहा लाख मेट्रिक टन तूर शिल्लक असल्याचे सांगण्यात येते. अशा स्थितीत आयात थांबवून देशांतर्गत शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे असताना सरकारकडून तुरीचे भाव पाडण्याचे षड्यंत्र रचल्याचा आरोप शेतकऱ्यांमधून होत आहे. सध्या जिल्ह्यातील दुधनी, अक्कलकोट, सोलापूर व बार्शी बाजार समितीमध्ये तुरीची आवक सुरू आहे.

**तीन वर्षांत प्रथमच सोयाबीन पाच हजार पार**

जवळपास तीन-साडेतीन वर्षांच्या मंदीनंतर राज्यात अनेक ठिकाणी सोयाबीनचे दर थेट ५,१०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत पोहोचले आहेत. जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये मिल क्वालिटी सोयाबीनच्या दरात तेजी कायम आहे. सध्या या सोयाबीनला कमाल ५ हजार ते ५ हजार २५० रुपये प्रतिक्विंटल असा सरासरी दर मिळत आहे. जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये सोयाबीनच्या दराने ५ हजार रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. शासनाने सोयाबीनसाठी ५ हजार ३२८ रुपये प्रतिक्विंटल असा हमीभाव घोषित केला आहे. अमेरिका व ब्राझील या प्रमुख सोयाबीन उत्पादक देशांमध्ये उत्पादन घटण्याची शक्यता, सोयाबीन डीओसीला बाजारात वाढलेली मागणी आणि नाफेडमार्फत हमीभावाने सोयाबीन खरेदी सुरू झाल्याने बाजार समित्यांतील आवक घटली. या तीन प्रमुख कारणांमुळे सोयाबीनच्या दरात तेजी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# बँकेच्या सेवा ग्राहकांच्या दारात घेऊन जाण्याचा पोस्टाचा प्रयत्न : पासंगराव

### लाडक्या बहिणींची पोस्टात दोन लाख खाती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अतिशय महत्वकांक्षी योजना असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यात यशस्वी ठरत आहे. यानिमित्ताने भारतीय पोस्ट विभागात लाडक्या बहिणींचा वावर वाढला आहे.

सोलापूर शहर, जिल्ह्यातील लाडक्या बहिणींनी राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी पोस्ट बँकेत सुमारे दोन लाख ८७ हजार ५२० खाती काढलेली असून या माध्यमातून २७६ कोटी रूपये अनुदानाचे वितरण करण्यात आले आहे.

प्रत्येक महिला या मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी आहेत. या योजनेच्या नावाने अनुदानही वितरीत केले जाते.

> पोस्टावर लोकांचा आजही विश्वास असून हे अनेकवेळा सिद्ध झाले आहे. पोस्टही टपालाबरोबर बँकींगची सेवा अधिक लोकांना देण्याचा प्रयत्न करत आहे. याचाच भाग म्हणून आता पोस्टाच्यावतीने बँकेच्या सर्व सेवा ग्राहकांच्या दारात घेऊन जाण्याचा प्रयत्न पोस्ट करत आहे.
>
> **-विनायक पासंगराव, वरिष्ठ प्रबंधक पोस्ट बँक**

पूर्वी मोजकेच बचत खाते पोस्टात असायचे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर पोस्ट बँकेत बचत खाते काढणाऱ्या महिलांची संख्या वाढली आहे. बँकांचे अधिकारी किंवा कर्मचारी हे खातेदारांच्या दारापर्यंत सेवा देत नाहीत. पण, पोस्टाची यंत्रणा ही सर्व योजनांची सेवा ही खातेदारांच्या दारावर घेऊन जात आहेत. यामुळे लाडक्या बहिणींचा कल पोस्टाकडे जास्त वाढताना दिसत आहे.

# माहिती अधिकाराचा भंग; अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

माहिती अधिकारात दाखल झालेल्या द्वितीय अपील क्रमांक २५४८-२५४९/२०२४ सोलापूर प्रकरणात राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांनी सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग (माध्यमिक) येथील अधिकाऱ्यांच्या गंभीर निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त करत कडक आदेश दिले आहेत.

सदर प्रकरणात अपीलार्थी योगेश नागनाथ पवार यांनी माध्यमिक शिक्षण विभागाकडून शालार्थ आयडी प्रस्ताव, नियुक्ती कॅम्प, वैयक्तिक मान्यता आदेश आदी बाबत माहिती मागितली होती. मात्र, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत कोणतीही माहिती न देता ठढख कायद्यातील कलम ७(१) चा भंग केला. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही प्रथम अपिलावर सुनावणी न घेता आदेश पारित न करता कलम १९(१) चे उल्लंघन केल्याचे आयोगाने स्पष्ट केले.

राज्य माहिती आयोगाने ही बाब गंभीर स्वरूपाची असल्याचे नमूद करत, सध्याच्या जन माहिती अधिकाऱ्याला आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत मागितलेली सर्व उपलब्ध व देय माहिती विनामूल्य (कलम ७(६)) अपीलार्थी योगेश पवार यांना देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. याचबरोबर, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुद्ध कलम २०(१) अंतर्गत दंडात्मक कारवाई का करू नये, तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांचे विरुद्ध कलम २०(२) अन्वये शिस्तभंग कारवाईची शिफारस का करू नये, याबाबत आयोगास समक्ष उपस्थित राहून लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, कोणतीही पूर्वसूचना किंवा परवानगी न घेता द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांविरोधात सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक. ०१.१२.२०१५ नुसार कारवाई प्रस्तावित का करू नये, याबाबतही खुलासा मागवण्यात आला आहे. या निर्णयामुळे माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीत होत असलेल्या दिरंगाई, माहिती दडपण्याची प्रवृत्ती आणि प्रशासकीय बेपर्वाईवर आयोगाने कठोर संदेश दिला असून, नागरिकांच्या माहितीच्या हक्काला बळकटी मिळाली आहे.

# गुरुकुलम न्यासातर्फे मोफत गीता अभ्यास व प्रमाणपत्र वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

श्री गुरुकुलम न्यास, मुंबई यांचे माध्यमातून अध्यक्ष मंजेरी फडके यांनी एक महिना दररोज दुपारी १ ते ३ या वेळेमध्ये बसवेश्वर मंदिर, सोरेगाव सोलापूर येथे सोरेगाव भजनी मंडळाचे संयोजनातून मोफत गीता पठणाचे वर्ग घेतले. गीता हा अठरा अध्याय व सातशे श्लोक असलेला ग्रंथ असून तात्विक आणि ज्ञान संपन्न आहे.

प्रत्येक अध्याय झाल्या नंतर लेखी पेपर घेण्यात आले. अठरा अध्याय असल्याने अठरा लेखी पेपर व नंतर तोंडी परीक्षा घेण्यात आली. या वर्गात १५ साधकानी भाग घेतला असून सर्व साधकांना सुधाकर इंगळे महाराज (राष्ट्रीय



अध्यक्ष) यांचे हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. श्रीमदभगवादगीता हा ग्रंथ देववाणी असून संस्कृत भाषेत असल्यामुळे सर्व भाविकांना वाचन व अभ्यास करणे खूप कठीण जाते. परंतु गीता सार हे मनुष्य जीवनासाठी अत्यंत आवश्यक असल्याने अनेक ठिकाणी गीता ग्रंथाचे पारायण केले जाते. आपले मनोगत व्यक्त करताना सुधाकर इंगळे महाराजांनी संस्थेविषयी गौरवोदगार काढले व श्रीकृष्णमूर्तीचे पूजन करून दिपाप्रज्वलन केले.

श्री गुरुकुलम न्यास या संस्थेने हे सर्व शिक्षण मोफत देऊन अन्नदान ही केले. परीक्षेसाठी परीक्षक राजश्री देशपांडे (मुंबई) यांनी काम पाहिले. मल्लिकार्जुन म्हेत्रे, मंगल दीक्षित यांनी हा संस्कार वर्ग व्यवस्थित पूर्ण करण्यासाठी परिश्रम घेतले.

# शिवाजी महाराजांचा पुतळा होणार खुला

### शिवप्रेमींमध्ये आनंदोत्सव; नूतन नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणाचे काम आता अंतिम स्वरूपात आहे. येत्या महिन्याभरात, विशेषत: फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात एक फेब्रुवारी आणि शिवजयंतीपूर्वी पुतळा नागरिकांसाठी खुला केला जाणार आहे. शेवटच्या टप्प्यात सुरक्षा भितींवर मावळे बसवण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. राजमुद्रादेखील बसवण्यात येणार आहे. तब्बल दीड वर्षांच्या कालावधीनंतर शिवरायांचा पुतळा पुन्हा दर्शनासाठी उपलब्ध होणार असल्याने शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.





दरम्यान, गेल्या दीड वर्षांपासून पुतळा सुशोभीकरणाचे काम सुरू होते. मात्र कामाची गती संथ असल्याने नागरिक, विशेषत: शिवप्रेमींमध्ये नाराजी व्यक्त होत होती. महापालिका प्रशासन आणि संबंधित ठेकेदारांकडील अडथळ्यांमुळे छत्रपती शिवाजी महाराजांना जणू 'बंदीवास' सहन करावा लागत असल्याची भावना जनतेत होती. अखेर ही प्रतीक्षा संपत असून,जानेवारी अखेरीस पुतळ्याचे संपूर्ण काम पूर्ण होणार आहे. नूतन नगरसेवक शिवाजी वाघमोडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, संभाजी आरमारचे तसेच शिवस्मारक जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे सदस्य श्रीकांत डांगे यांनी पुतळ्याच्या परिसरातील सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करत उर्वरित कामकाज करण्यासंबंधी सूचना केल्या.

**शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार**

पुतळा परिसराचे सुशोभीकरण पूर्णत्वास जात असून, प्रकाशयोजना, दगडी काम व सभोवतालच्या जागेचे सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे. दि. १९ फेब्रुवारी शिवजयंतीपूर्वीच हा पुतळा खुला होत असल्याने, आगामी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार असल्याचा विश्वास शिवप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# लोखंडी कपाटाच्या ड्रॉवरमधून सोन्याचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सलगर वस्ती पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दिनांक १ जानेवारी रोजी सायंकाळी ८.०० वाजेपासून ते २ जानेवारी रोजी सायंकाळी ८.३० वाजेच्या दरम्यान भीम नगर, सोलापूर येथे घडली. याबाबत दि १९ जानेवारी रोजी रात्री १०.२६ वाजता सलगर वस्ती पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. फिर्यादी रेखा आनंद गायकवाड वय ५६ वर्षे, रा. पूर्णव, भीम नगर, ता. उत्तर सोलापूर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या यशस्वी किराणा व स्टेशनरी दुकानात व्यवसाय सुरू असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडीने दुकानातील लोखंडी कपाटाच्या ड्रॉवरमधून सुमारे ९० हजार रुपये किमतीचे ३ तोळ्यांचे सोन्याचे गंठण चोरून नेले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार वाल्मीकी करीत आहेत.



# हरिभाई देवकरण महाविद्यालयात पारितोषिक वितरण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

हरिभाई देवकरण महाविद्यालयात शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली अंतर्गत पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुण्या ॲडवोकेट पौर्णिमा शंके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबतच मूल्यसंस्कार, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. यश हे केवळ पारितोषिकांपुरते मर्यादित नसून, अपयशातून शिकण्याची तयारी आणि ध्येयाप्रती प्रामाणिकपणा यातूनच खरे यश मिळते, असे प्रेरणादायी विचार त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक वातावरणात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून स्वत:च्या क्षमतांवर विश्वास ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या प्राचार्या दीपा फाटक यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्यासाठी सातत्याने प्रयत्न करावा असे नमूद केले. प्रास्ताविक प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षक बी. डी. बनसोडे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीनिवास गवंडी यांनी केले, पारितोषिकांचे यादी वाचन प्रा. प्रमोद गाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. नितीन पतंगे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, कार्याध्यक्ष प्रा. चंद्रकांत जाधव, पर्यवेक्षक बी. डी. बनसोडे, पर्यवेक्षक ए. सी. राऊत, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. पी. पी. कदम यांनी परिश्रम घेतले.

# विजयपुरात २५ जानेवारीला आदि बनजिग वधू-वर संमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-.**

रथसप्तमीच्या मुहूर्तावर रविवार दि. २५ जानेवारी रोजी विजयपूर शहरातील बीएलडीई हॉस्पिटलजवळील श्री संगनबसव समुदाय भवन, लिंगदगुडी रोड येथे राज्यस्तरीय आदि बनजिग समाज वधू-वर संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष सोमलिंग कटावी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

हे संमेलन जिल्हा वीरशैव लिंगायत आदि बनजिग क्षेमवृद्धी संघटना, विजयपूर (रजिस्टर) व वधू-वर माहिती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे. आजच्या काळात अनेक पालकांना आपल्या पाल्यांसाठी योग्य स्थळ शोधताना अडचणी येत असून, या पार्श्वभूमीवर हे संमेलन समाजासाठी सुवर्णसंधी ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. भव्य आणि खर्चिक विवाह सोहळ्यांना आळा घालून साध्या पद्धतीने विवाह करण्यास प्रोत्साहन देणे, तसेच शेतकरी कुटुंबातील युवक-युवतींच्या विवाहासाठी मदत करणे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा सामाजिक उद्देश असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ९४४८३३५५८७, ९४४८१४५७४२, ९४४८११०३६२, ९४४८६४४७३० या क्रमांकांवर संपर्क साधावा. वधू-वरांची माहिती संघटनेच्या कार्यालयात जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी अध्यक्ष सोमलिंग कटावी, सचिव सुरेश परगोंडये, परशराम चिंचली, मल्लिकार्जुन बिरजगी तसेच गौरवाध्यक्ष सुरेश गच्चीनकटी उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## भारत विकास परिषदेच्या वतीने तिळगुळ समारंभ उत्साहात

**पंढरपूर, दि. २१ जानेवारी-**

भारत विकास परिषदेच्या वतीने मकर संक्रातनिमित्त तिळगुळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आहार हेच औषध या विषयावर डॉ. गायत्री देशपांडे यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या व स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदे मातरम् गायनाने झाली. ॲड. मल्लिनाथ शहाबादे यांचे कुटुंब प्रबोधन या विषयावर मार्गदर्शन झाले झाले. भारत विकास परिषदेचे अध्यक्ष महादेव न्हावकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक भारत विकास परिषदेच्या महिला प्रमुख किशोरी भट यांनी केले. संस्थेचे सदस्या आरती फडके यांनी आभार प्रदर्शन केले. सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



## नगरसेविका श्वेता खरात यांचा वटवृक्ष मंदिरात सत्कार

**अक्कलकोट दि. २१ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १६ ब मधून निवडून आलेल्या नुतन नगरसेविका श्वेता खरात (खांडेकर) यांनी आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी नगरसेविका म्हणून निवडून आल्याबद्दल नगरसेविका श्वेता खरात (खांडेकर) यांचा वटवृक्ष मंदिरात मंदीर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, विपूल जाधव उपस्थित होते.




## नूतन नगरसेविका निर्मला जंगम यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

महानगर पालिका सार्वत्रिक निवडणुकीत प्रशालेचा विद्यार्थी हरिश जंगम यांच्या पत्नी निर्मला जंगम या प्रभाग क्र. १७ मधून नगरसेविका म्हणून निवडून आल्याने त्याचा महावीर हायस्कूल व चतुरबाई श्राविका विद्यालय यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले. प्रारंभी सरस्वती प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या सत्कार सोहळ्यासाठी अध्यक्ष महावीर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका उज्वला पाटील होत्या. त्यांच्या हस्ते नूतन नगरसेविका निर्मला जंगम आणि त्यांचे पती हरिश जंगम यांचा शाल, श्रीफल देऊन त्यांना गौरवण्यात आले. त्यांचा परिचय व प्रास्ताविक राजेंद्र खोत यांनी केले. आपल्या मनोगतात निर्मला जंगम यांनी कृतज्ञता व प्रशालेप्रती आदर व्यक्त करुन महावीर हायस्कूल व चतुरबाई श्राविका विद्यालय या बहुजनांच्या बालकांना विद्यार्थी म्हणून घडविण्यासाठी मोलाचा वाटा उचलतात आणि बहुजनांची शाळा असल्याबद्दल अभिमान वाटत असल्याचे नमूद केले. सूत्रसंचालन बसवराज बिराजदार यांनी केले.

# सामाजिक क्रांतीचे पाऊल; ‘मी विधवा नव्हे, मी स्त्री’

### गोरमाळे येथे एकता महिला मंचचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२१ जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील गोरमाळे येथे एकता महिला मंच यांच्या वतीने मकरसंक्रांतीचे औचित्य साधून ‘मी विधवा नव्हे, मी स्त्री’ हा एक अत्यंत स्तुत्य आणि अभिनव उपक्रम राबवण्यात आला. समाजातील जुनाट प्रथांना छेद देत विधवा भगिनी आणि सुवासिनींचा एकत्रित हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर एकता महिला मंचच्या वतीने उपस्थित पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी महिलांना मार्गदर्शन करताना पोलीस कॉन्स्टेबल सोनियादेवी मुंढे यांनी सुरक्षेबाबत मोलाचा सल्ला दिला. त्या म्हणाल्या, महिलांनी स्वतःला कधीही हतबल समजू नये. कोणत्याही प्रकारचा त्रास, छळ किंवा अडचण असल्यास तात्काळ डायल ११२वर संपर्क साधावा किंवा थेट आमच्याशी संवाद साधावा. पोलीस प्रशासन महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी या उपक्रमाची रूपरेषा मांडताना सांगितले की, पतीच्या निधनानंतर स्त्रीला दुय्यम स्थान देण्याची प्रथा आता थांबली पाहिजे. मी विधवा नव्हे, मी स्त्री या भावनेतून महिलांनी स्वाभिमानाने जगावे, हाच या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सोहळ्यासाठी ग्रामसेविका विजयालक्ष्मी पवार, पोलीस कॉन्स्टेबल सोनियादेवी मुंढे, पोलीस कॉन्स्टेबल फपाळ, एकता महिला मंच प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, तसेच एकता महिला मंचच्या सुशीला सोनवणे, दैवशाला पालखे, शोभा पालखे, पूनम गिराम, जयश्री जाधव, जयश्री झोरी उपस्थित होत्या. सूत्रसंचालन जयश्री जाधव यांनी केले. प्रास्ताविक सुशीला सोनवणे यांनी मांडले, तर उपस्थितांचे आभार प्रभाकर क्षीरसागर यांनी मानले.

> **स्पर्धेचे विजेते :** उखाणे स्पर्धा: प्रथम : शांताबाई झोरी, द्वितीय : सुशीला सोनवणे, तृतीय: दैवशाला पालखे. ✻ संगीत खुर्ची: प्रथम गौरी बनसुडे, द्वितीय : तेजस्विनी कोंढारे, तृतीय : अन्नपूर्णा बनसुडे. या विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.



# अहिल्या पुलावरील संरक्षक कठडे तात्काळ दुरुस्त करावेत

### प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ जानेवारी-**

माघ शुद्ध एकादशी २९ जानेवारी रोजी होणार आहे. यात्रा कालावधी २३ जानेवारी ते १ फेब्रुवारी असून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात तीन ते चार लाख भाविक येतात. या यात्रा कालावधीत अहिल्या पुलावरुन वारकरी भाविकांच्या व इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. अहिल्या पुलावरील संरक्षक कठडे नादुरुस्त असून, या ठिकाणी कोणतीही अनुचित घडना घडू नये यासाठी तात्काळ मजबूत संरक्षक कठडे करावेत तसेच प्रखर प्रकाश व्यवस्था करावी अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

माघवारी पूर्व नियोजनाबाबत प्रांत कार्यालय पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उप कार्यकारी अभियंता भीमाशंकर मेटकरी, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश आनेचा उपस्थित होते.




यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्रात वारकरी भाविकांना पवित्र स्नान करता यावे यासाठी पाटबंधारे विभागाने पाणी सोडण्याचे नियोजन करावे. या कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा, वाळवंटाचीस्वच्छता व पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे तसेच अतिक्रमणे काढावीत, बोअरवेल व हातपंप पाण्याची तपासणी करावी. मंदीर समितीने व नगरपालिकेने प्रदक्षिणा मार्ग, नदीपात्रात आवश्यक ठिकाणी बॅरकेंटींग करावे व अग्निशामक यंत्रणा कार्यरत ठेवावी. तसेच मोफत वाहनतळ व्यवस्थेबाबत ठळक फलक लावावेत. अन्न औषध प्रशासन विभागाने अन्नाची तसेच शहरातील हॉटेलची वेळोवेळी तपासणी करावी. वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने नियोजन करावे. अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

> **भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य**
>
> मंदीर समितीने यात्रा कालावधीत भाविकांना दर्शनरांगेत मॅट, बसण्याची सुविधा, पिण्याचे पाणी, शौचालये, विश्रांती कक्ष, बाथरूम, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. दर्शनरांगेत भाविकांना मोफत चहा व खिचडी वाटप करण्यात येणार आहे. चेंजिंग रूम, हिरकणी कक्ष, दर्शनमंडप येथे महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, चंद्रभागा वाळवंट येथे चेंजिंग रूम उभारण्यात येत आहे. तसेच भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य दिले असून, यासाठी योग्य नियोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी दिली.

# बार्शी शहर पोलीस ठाणे येथील बेवारस मुद्देमालाचा लिलाव जाहीर

### १ लाख ३८ हजारांचा शासन जमा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ जानेवारी-**

बार्शी शहर पोलीस ठाणे येथे मागील काही वर्षापासून २८ बेवारस वाहने पडून होती. त्याचा कायदेशीर लिलाव प्रक्रिया पुर्ण करुन तहसीलदार, बार्शी यांची परवानगी घेण्यात आली होती.

त्यासाठी बार्शी शहर पोलीस ठाणेकडून वेळोवेळी प्रसिध्दी देण्यात आली होती. त्या अनुषंगाने दि. २० जानेवारी रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे तसेच दोन पंचासमक्ष जाहीर लिलाव ठेवण्यात आला होता. लिलावासाठी व त्यांनतर देखील काही अटी व शर्ती ठेवण्यात आल्या होत्या.

बेवारस वाहनाच्या लिलावासाठी विविध शहरातील एकूण २४ व्यावसायिकांनी सहभाग घेतला होता. लिलावाची सुरुवात १,१५,०००/- रपयांपासून सुरु होऊन १,३८,०००/- रुपयाला संपली. सदरचा लिलाव वसिम स्क्रॅप मर्चटचे मालक वसिम युसुफ शेख, रा. तेलगाव नाका, बीड यांनी घेतला. इतर व्यावसायिक व पोलीस अधिकारी यांनी वसिम शेख यांचे अभिनंदन केले.बेवारस वाहनांचा लिलावासाठी पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच बार्शी शहर पोलीस ठाणेकडील बार्शी शहर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, पोसई महेश गळगटे, पोहेकॉ सचिन कदम, पोहेकॉ विलास आडसूळ तसेच इतर स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

# सोलापूरच्या प्रिसिजन कंपनीसाठी विविध पदांसाठी भरती

### लातूर, धाराशिव व उमरगा परिसरातील उमेदवारांच्या मुलाखती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

औद्योगिक क्षेत्रातील नामांकित कंपनी प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड यांच्याकडून लातूर, धाराशिव व उमरगा परिसरातील युवकांसाठी विविध पदांसाठी थेट मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे. कंपनीच्या उत्पादन प्रकल्पांच्या विस्तारामुळे कुशल व अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता असून या भरती प्रक्रियेद्वारे स्थानिक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या भरतीअंतर्गतऑपरेटिंग इंजिनिअर, टीम लीडर आणि हेल्परही पदे भरण्यात येणार आहेत. संबंधित पदांसाठी आयटीआय (फिटर, इलेक्ट्रिशियन, मेकॅनिक, टर्नर आदी) तसेच औद्योगिक अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना आकर्षक वेतन, सुरक्षित कार्यपरिसर व दीर्घकालीन नोकरीची संधी मिळणार आहे.इच्छुक व पात्र उमेदवारांनी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे व ओळखपत्रांसह खाली दिलेल्या ठिकाणी थेट मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन प्रिसिजन कंपनीकडून करण्यात आले आहे. भरतीसाठी पी. पी. खेर यांना ९०४९००७४४२ या क्रमांकावर संपर्क करावा.

> **असे असेल मुलाखतींचे वेळापत्रकः (वेळ सकाळी ११ पासून)**
>
> धाराशिव- २५ जानेवारी-स्थळ-तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर रोड. उमरगा- २८ जानेवारी - स्थळ- श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय. लातूर- २९ जानेवारी, स्थळ-दयानंद कॉमर्स कॉलेज.



## बार्शीच्या एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्चचा माजी विद्यार्थी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ जानेवारी-**

माईर्स एमआयटी पुणे अंतर्गत कार्यरत बार्शीतील एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्चचा माजी विद्यार्थी मेळावा २०२६ (पुणे चॅप्टर) कोथरुड येथील एमआयटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी कॅम्पसमध्ये संत ज्ञानेश्वर सभागृहात पार पडला.

‘द होमकमिंग’ संकल्पनेवर आधारित या मेळाव्यासाठी विविध शाखांतील माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर विविध बॅचमधील यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा संस्थेच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी माजी विद्यार्थी गगन वर्मा, विश्वास पाटील व अंकित खाडे यांनी एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्चमधील शैक्षणिक वातावरण, प्रशिक्षण व प्लेसमेंट सहाय्य यांचा आपल्या करिअर घडणीत महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे यांनी स्वागतपर भाषण केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आणि रेल्वे इंजिनिअरिंग कॉलेजच्या मार्गदर्शक प्रा. प्रभा कासलीवाल यांनी मेंटॉरशिप व उद्योग संपर्कावर भर देत सातत्याने संस्थेच्या उपक्रमांशी जोडले जाण्याचे आवाहन माजी विद्यार्थ्यांना केले. माजी विद्यार्थी समन्वयक प्रा. अभिजीत पवार यांनी आभार मानले.

## भारत मराठी विद्यालयात बाल आनंद मेळावा साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

मजरेवाडी येथील भारत मराठी विद्यालयात बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी भारत मराठी विद्यालयाच्या मुख्याध्यापक एस. के. सरसंबे होते तर प्रमुख पाहुणे शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष वसीम पठाण हे उपस्थित होते. याप्रसंगी सहशिक्षिका हिना बागवान यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व फित कापून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी मराठी विद्यालयाचे सहशिक्षिका टी. टी. वडावराव यांनी बाल आनंद मेळाव्याचे महत्त्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांनी व्यवहार ज्ञान आत्मसात करुन आपले जिवन सक्षम बनवावे असे आवाहन मनोगतातून व्यक्त केले. अध्यक्षांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. या मेळाव्यात इ. १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी १८ खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले.

विद्यालयातील विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी या खाद्यपदार्थांचा आनंद घेतला. खाद्यपदार्थ्यांची एकूण विक्री ९७४० झाली. या उद्घाटनप्रसंगी शिक्षक पालक संघ व शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, पालक बहुसंख्य विद्यार्थी व सहशिक्षक एस.एम. ढाकणे, एन. झेड. सय्यद, मुस्कान मंगळूरे उपस्थित होते. सूत्रसंचालन सहशिक्षिका वाय.एन. देवणगाँवकर यांनी केले तर आभार सहशिक्षिका एस. एम. शेख यांनी मानले.

# माघवारी सोलापूरकरांची...

पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तीर्थव्रत ।। या जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराजांच्या अभंगानुसार पंढरपूरच्या वारीची परंपरा जतन करण्याचे काम प्रत्येक वारकरी करताना दिसतो. दर पंधरा दिवसाला वारी करणारे, दर महिन्याला वारी करणारे, चार वाऱ्या करणारे, दोन वाऱ्या करणारे व वर्षातून एक तरी वारी करणारे असे प्रकार वारकऱ्यांमध्ये आहेत. वारकरी सांप्रदायात आचार, विचार व नियमाला विशेष प्राधान्य आहे. युक्त आहार विहार । नेम इंद्रायासी सार । नसावी बासर । निद्रा बहु भाषण ।। ही संतांनी तयार केलेली वारकरी सांप्रदायाची आचारसंहिता आहे. चार वाऱ्यांपैकी महत्वाची असलेली माघ वारी सोलापूरकरांची म्हणून ओळखली जाते. या वारीला सोलापूर शहरांसह जिल्ह्यातील अनेक पायी दिंड्या पंढरपूरकडे प्रस्थान ठेवतात. सोलापूर शहरातून बैलगाड्यासह वारीची २०० वर्षापासूनची परंपरा आजही येथील विविध समाज व वारकरी मंडळासह अनेक गावातील मंडळांनी सुरू ठेवली आहे. या वारीसाठी सोलापूर शहरातील दिंड्याचे एकत्रिकरण करण्याचे काम गेल्या २० वर्षापासून सुरू आहे. हा सोहळा आषाढी प्रमाणे करण्याचा प्रयत्न येथील वारकरी मंडळाचा आहे. त्याला बऱ्यापैकी सध्या यश आल्याचे दिसत आहे. त्यातूनच रिंगण सोहळा व प्रस्थान सोहळा पंरपरेनुसार दिमाखदार होत आहे.

माघवारी म्हणजे केवळ परंपरा नाही, तर सोलापूरकरांच्या श्रद्धेचा जिवंत सोहळा आहे. अंगाला झोंबणारी थंडी आणि अंतरात विठ्ठल नामाची ऊब... हा अनुभव काही वेगळाच असतो. सोलापूर आणि पंढरपूर यांचे नाते अतूट आहे. आषाढी आणि कार्तिकी वारीनंतर भाविकांसाठी सर्वात महत्त्वाची असते ती म्हणजे 'माघी वारी'. माघ शुद्ध एकादशीला (ज्याला 'जया एकादशी' असेही म्हणतात) पंढरपुरात मोठा उत्सव साजरा केला जातो. सोलापूरकरांसाठी या वारीचे महत्त्व विशेष आहे, कारण या काळात सोलापूर जिल्ह्यातून आणि शहरातून मोठ्या प्रमाणात पायी दिंड्या पंढरीकडे प्रस्थान करतात. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि विठ्ठल हे अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात वर्षातून चार मुख्य वाऱ्या होतात. आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री. यामध्ये माघी वारीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. विशेषतः सोलापूर जिल्ह्यासाठी ही वारी म्हणजे एक कौटुंबिक सोहळाच असतो. पंढरपूरच्या वारीची परंपरा तशी ८०० वर्षांहून अधिक जुनी आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज यांनी वारकरी संप्रदायाला संघटित स्वरूप दिले. आषाढी आणि कार्तिकी वारीला 'मोठी वारी' म्हटले जाते, परंतु माघी वारीचा विस्तार पेशवे काळात आणि त्यानंतरच्या काळात अधिक वाढला. ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिले तर, माघ महिना हा थंडीचा आणि सुगीचा काळ असतो. शेतीची कामे आटोपल्यानंतर शेतकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी बाहेर पडतो. सोलापूर हे पंढरपूरचे मुख्य प्रवेशद्वार आणि जवळचे मोठे शहर असल्याने, ऐतिहासिक काळापासून सोलापूरच्या व्यापारी आणि विणकर समाजाने माघवारीची परंपरा जोपासली आहे. येथील गिरणी कामगार व गावखेड्यातील शेतकरी या वारीत मोठ्या संख्येने सहभागी होतो. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज आणि पंढरपूरचे श्री विठ्ठल यांचे आध्यात्मिक नाते अतिशय जवळचे आहे. सोलापुरात जानेवारी महिन्यात गड्डा यात्रा (सिद्धेश्वर यात्रा) संपन्न होते. या यात्रेच्या सांगतेनंतर लगेचच माघवारीचे वेध लागतात. अनेक भाविक सिद्धेश्वराची वारी करून थेट पंढरीची वाट धरतात. सोलापूरमधील पद्मशाली, वीरशैव लिंगायत, वडार समाज, कैकाडी आणि इतर समाजघटक शेकडो वर्षांपासून ही परंपरा चालवत आहेत. सोलापूर ते पंढरपूर हे अंतर साधारणपणे ७० ते ७५ किलोमीटर आहे. माघ एकादशीच्या ३ ते ४ दिवस आधी सोलापूर शहरातून विविध दिंड्यांचे प्रस्थान होते. यंदा सोलापूर शहरातील ३३ दिंडया, परिसरातील २५ दिंडया आणि ५० भजनी मंडळांच्या उपस्थितीत शनिवार दि.२४ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता श्री मार्कंडेय मंदिर येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी, संत तुकाराम महाराज पालखीचे पूजन होणार आहे. पद्मशाली ज्ञाती संस्थेतर्फे सर्व विणेकरी महाराजांचा सन्मान करण्यात येणार आहे. नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर दुपारी ४ वाजता अश्वांचा गोल रिंगण सोहळा आहे. यावेळी ध्वजधारी रिंगणासह पारंपरिक रिंगण होऊन शेवटी अश्व रिंगण होणार आहे. २५ जानेवारीला सकाळी ८ वाजता तिऱ्हे मार्गे पालखी पुढे मार्गस्थ होणार आहे. काही दिंड्या परंपरेनुसार मोहोळमार्गे पंढरपूरला जाणार आहेत. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'च्या जयघोषात वातावरण भक्तिमय होते.




माघी वारी ही आषाढी वारीपेक्षा थोडी वेगळी असते. आषाढीला पावसाळा असतो, तर माघी वारीला थंडी असते. माघ महिन्यात चंद्रभागेच्या वाळवंटात पहाटे स्नान करणे हे अत्यंत पुण्यकारक मानले जाते. कडाक्याच्या थंडीतही भाविक भक्तीच्या उबेने विठ्ठल नामाचा गजर करतात. एकादशीच्या दिवशी विठ्ठलाचे दर्शन घेऊन द्वादशीला ‘काल्याचे कीर्तन’ होते आणि वारीची सांगता होते. माघवारीला मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील भाविकांचीही गर्दी जास्त असते. या वारीला औसा संस्थानची दिंडी मोठी असते. सोलापूर जिल्ह्यातीलही दिंड्या या वारीत मोठ्या संख्येने सहभागी होतात. वारीमध्ये जाती-पातीचा भेद उरत नाही. प्रत्येक जण 'विठ्ठल' म्हणून एकमेकांच्या पाया पडतो. ही सामाजिक समरसता वारीचे सर्वात मोठे यश आहे. काळानुसार वारीच्या स्वरूपात बदल झाले आहेत. पूर्वी लोक बैलगाडीने किंवा पायी जायचे. आज वाहतुकीची साधने वाढली आहेत, तरीही सोलापूरहून पायी जाणाऱ्यांची संख्या कमी झालेली नाही. तरुण पिढी देखील आता मोठ्या उत्साहाने या परंपरेत सहभागी होताना दिसते. सोशल मीडियाच्या माध्यमातून वारीचे थेट प्रक्षेपण आणि माहिती घराघरात पोहोचत आहे. सोलापूर ते पंढरपूर ही माघवारी केवळ एक प्रवास नसून तो एक आध्यात्मिक अनुभव आहे. ही वारी सोलापूरच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

आपला जिल्हा
गुरुवार, दि.२२ जानेवारी २०२६




## सांगोला तहसिल कार्यालयात नियंत्रण व तक्रार कक्ष स्थापन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ चा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांसाठी तीन निवडणूक निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली असून सांगोला तालुक्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी, महाउर्जा प्रकल्प, पुणे येथील अरुण आनंदकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



सांगोला तालुक्यातील निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी तहसिल कार्यालय सांगोला येथे नियंत्रण व तक्रार कक्ष स्थापन करण्यात आला आहे. मतदारांना तक्रारी नोंदविण्यासाठी दूरध्वनी क्रमांक २०१८७ २२०२१८ उपलब्ध करून देण्यात आला आहे. ही माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ तथा तहसिलदार सांगोला बाळूताई भागवत यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# भाजपाने ‘एबी’ फॉर्म वाटपाचा महापालिका पॅटर्नच जि.प.साठी राबविला; बंडखोरी टाळण्याचा प्रयत्न

### १ तासापूर्वी अधिकृत उमेदवारांच्या हाती पडले फॉर्म

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजपाकडे इच्छुकांची गर्दी वाढल्याने याही निवडणुकीत बंडखोरी टाळण्यासाठी भाजपकडून एबी फॉर्म वाटपाचा महापालिका पॅटर्नच आज राबविला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीच यासाठी योग्य उमेदवार निवडून त्यांचे एबी फॉर्म त्यांच्याच तालुक्यातील,



मर्जीतील वरिष्ठ नेत्यांच्या हाती देवून फॉर्म भरायच्या एक तास अगोदर हे एबी फॉर्म अधिकृत उमेदवारांच्या हाती देण्याच्या सुचना केल्या आणि त्या पध्दतीने अगदी शिस्तबध्द फॉर्म पोहोच झाल्याची माहिती भाजपा गोटातून मिळाली.



आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. या निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत मिनी मंत्रालयावर सत्ता मिळविण्यासाठी भारतीय जनता पार्टीने कंबर कसली असून, पक्षातील संभाव्य बंडखोरी टाळण्यासाठी भाजपकडून एबी फॉर्म वाटपासाठी महानगरपालिकेचा पॅटर्न राबविला आहे. अगदी शेवटच्या घटकाला एबी फॉर्म वाटपाचे नियोजन केले होते. तरीही अनेकांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी आज शेवटच्या दिवशी आपले अर्ज दाखल केले आहेत. महापालिका निवडणुकीप्रमाणेच याबाबत नियोजनबद्ध आखणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांना करून दिल्याचे वृत्त आहे.

बुधवारी सकाळी दहा वाजता एबी फॉर्म सोलापूर येथून घेऊन खासदूत प्रत्येक तालुक्याकडे रवाना झाले होते. त्या दूतामार्फत दुपारी बारा वाजे पर्यंत त्या-त्या तालुक्यातील एबी फॉर्म संबंधित नेत्याकडे देण्यात येणार होते. त्या नेत्यांमार्फत एबी फॉर्म ठरलेल्या उमेदवाराच्या नावे तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहेत. भाजपचा हा एबी फॉर्मचा फॉर्मुला सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत बंडखोरीला आळा घालणारा ठरला होता, हाच फॉर्मुला भाजपकडून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत वापरला जात असून, अगदी शेवटच्या क्षणाला उमेदवाराच्या नावे एबी फॉर्म संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर केले आणि त्याच वेळी उमेदवारालाही भाजपकडून उमेदवारी देण्यात आल्याचे सांगितले गेले आहे.

# जिप-पंस निवडणुकीत माकप प्रथमच

### जि.प. साठी १ तर पं.स. साठी ५ उमेदवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये प्रथमच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप) आपले उमेदवार रिंगणात उतरवत आहे. या निवडणुकीत पंचायत समितीसाठी पाच तर जिल्हा परिषदेसाठी एक उमेदवार उभे करण्यात आले आहेत.

कुंभारी, धोत्री, सांगोला, मंद्रूप, चपळगाव या भागांमध्ये माकपचा संघटित प्रभाव असून, स्थानिक शेतकरी व मतदारांच्या सक्रिय सहकार्याच्या जोरावर पक्षाचे उमेदवार विजय मिळवतील, असा विश्वास पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम यांनी व्यक्त केला आहे. विशेषतः रे नगर, गोदूताई परुळेकर नगर, कुंभारी व लगतच्या परिसरात पक्षाची मजबूत पकड आहे.जिल्हा परिषदेसाठी कुंभारी मतदारसंघातून कु. प्रियांका दोंतुल या उमेदवार रिंगणात आहेत. येत्या ८ फेब्रुवारी रोजी त्यांचा विवाह सोहळा असला तरी, त्या कॉ. नरसय्या आडम मास्तर यांचे जुने सहकारी व ज्येष्ठ कार्यकर्ते असलेल्या कुटुंबातून असल्याने त्यांना



ही संधी देण्यात आली आहे. पंचायत समिती धोत्री गणामधून भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघाच्या राज्य समिती सदस्या अश्विनी आडम या उमेदवार आहेत. तर कुंभारी गणातून नितीन यादगिरी, योगेश अकीम,मंद्रूप येथून यासीन मकानदार, आणि सांगोला चोपडी गणातून अतुल फसाले, चपळगाव गण राजेंद्र स्वामी मधून हे उमेदवार पंचायत समिती निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. बुधवारी सकाळी ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर व जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख मेजर यांच्या नेतृत्वाखाली सर्व उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी पक्षाचे राज्य समिती सदस्य ड अनिल वासम, विल्यम ससाणे, बापू साबळे, वसीम मुल्ला आदींची उपस्थिती होती.

# ‘दक्षिण’ मध्ये जि.प. च्या ६ जागांसाठी ७३ तर पंचायत समितीच्या १२ जागांसाठी १४५ अर्ज

### भाजपाच्या उमेदवारी वाटपात गोंधळ

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २१ जानेवारी...**

जिल्हा परिषद पंचायत समितीच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी चुका कडून मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल करण्यात आल्यामुळे निवडणुकीत चुरस दिसून येत आहे. दक्षिण मधील सहा जिल्हा परिषद जागांसाठी बुधवारी शेवटच्या दिवशी ५० उमेदवारांनी अर्ज दाखल केला असून एकूण ७३ अर्ज दाखल झाली आहेत. तर पंचायत समितीच्या १२ जागांसाठी शेवटच्या दिवशी ९९ उमेदवारांनी अर्ज दाखल केला असून एकूण १४५ उमेदवारांकडून अर्ज दाखल करण्यात आला आहे. पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये सर्वच पक्षांकडून उमेदवारी दाखल करण्यात आले असून निवडणूकीचा अंतिम चित्र २७ जानेवारीला स्पष्ट होणार आहे .

दक्षिणमध्ये प्रथमच भाजपाकडून एका जागेसाठी दोन एबी फॉर्म देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात गोंधळ झाला . त्यामुळे इच्छुकांमध्ये नाराजी दिसून येत आहे . यावर



पक्षश्रेष्ठी काय तोडगा काढणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे . बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दक्षिण तहसील कार्यालयासमोर इच्छुकांसह कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. यावेळी भाजपाकडून उमेदवारी व एबी फॉर्म मिळण्यासाठी नेत्यांसह कार्यकर्त्यांची धावपळ सुरू होती.

माजी आमदार दिलीप माने व भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांनी भाजपाचे एबी फॉर्म निवडणूक कार्यालयात सादर केले. तर दुसरीकडे आमदार सुभाष देशमुख यांच्या कार्यालयातून दीपक चोपडे यांच्यामार्फत एबी फॉर्म देण्यात आले . त्यामुळे भाजपामध्ये उमेदवारासाठी रस्सीखेच सुरू असताना गटबाजी दिसून येत होती. नऊ वर्षानंतर होत असलेल्या जिल्हा परिषद निवडणूकीसाठी शेवटच्या दिवशी बोरामणीसाठी १६, कुंभारी ५, वळसंग १२, हत्तूर ३, मंद्रूप ७ व भंडारकवठे ७ अर्ज दाखल करण्यात आले . तर पंचायत समितीच्या १२ जागांसाठी बोरामणी ६, कुंभारी ७, वळसंग ९, हत्तूर ११, मंद्रूप ८, भंडारकवठे ४, कासेगाव १३, धोत्री ५, होटगी १४, औराद १०, कंदलगाव ९, व निंबर्गी ३ दाखल करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या ६ जागांसाठी ७३ तर पंचायत समितीच्या १२ जागांसाठी १४५ अर्ज दाखल झाले असून निवडणूक बहुरंगी होणार असल्याचे स्पष्ट होत आहे. मात्र भाजपामधील गटबाजीवर पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेणार ? याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

# उमेदवारांचे शक्ती प्रदर्शन; अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी तोबा गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.२१ जानेवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी अर्ज भरण्याच्या आज शेवटच्या दिवशी राजकीय पक्षाच्या मातब्बर उमेदवारांनी शक्ती प्रदर्शन करित मोठ्या लवाजमा सोबत घेऊन वाजत गाजत उमेदवारी अर्ज दाखल केले. मोहोळ तहसील कार्यालयाच्या परिसरात उमेदवारांसह त्यांच्या कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती.

कामती जि. प. गट - विमलताई खताळ, कुरूल जि. प. गट -राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित ) जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, कुरुल जि. प. गट - सचिन जाधव, पेनुर जि.प. गट -शिवसेना (शिंदे ) चे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, पोखरापूर जि. प. गटातून सर्जेराव निळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. तालुक्यात ६ जिल्हा परिषद गट व १२ पंचायत समिती गणांची निवडणूक होत आहे. मंगळवारी जिल्हा परिषद गटासाठी १७ उमेदवारांनी तर पंचायत समिती गणासाठी २८ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. मंगळवारपर्यंत जिल्हा परिषदेसाठी एकूण२९ तर पंचायत समितीसाठी ३३ अर्ज असे एकूण ६२ अर्ज दाखल झाले होते. आमदार राजू खरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी कुरुल जि. प.गटातून, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे यांनी पेनुर जि.प.गटातून त्याचबरोबर पोखरापूर जि. प. गटातून नितीन निळे यांनी शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले.

यावेळी ज्येष्ठ नेते पद्माकर देशमुख, मोहोळच्या नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे, नगरसेवक रमेश बारसकर आदींसह शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस तसेच शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच कुरुल गटातून जकराया साखर कारखान्याचे अध्यक्ष सचिन जाधव यांनी भाजपामधून कार्यकर्त्यांसह वाजत गाजत शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल केला. यावेळी जालिंदर लांडे, राहुल जाधव, माऊली जाधव आदी उपस्थित होते.आष्टी जिल्हा परिषद गटातून भाजपाकडून समाधान शेळके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

मात्र भाजपाच्या जुन्या कार्यकर्त्यांनी आज एक बैठक घेऊन जुन्या कार्यकर्त्यांवर अन्याय अशी मागणी करत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या काही जागा देण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांना साकडे घातले. बैठकीला माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे, मोहोळचे मोहोळचे दोन्ही तालुकाध्यक्ष सतीश काळे व रमेश माने प्रदेश अनुसूचित जाती मोर्चाचे उपाध्यक्ष संजीव दादा खिलारे, मोहोळचे माजी तालुकाध्यक्ष आणि भीमा कारखाना संचालक सुनील चव्हाण, माजी तालुकाध्यक्ष संतोष नामदे आदींसह दीडशे ते दोनशे जुने कार्यकर्ते उपस्थित होते. त्यामुळे त्यांच्या तिकिटाविषयी विचार न झाल्यासत्यांची भूमिका काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पोखरापूर जिल्हा परिषद गट बालाजी नरोटे भाजप सर्जेराव निळे, नाना निळे (शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस), देविदास शेंडगे उद्धव ठाकरे (शिवसेना), नरखेड गट लक्ष्मण मगर (काँग्रेस), कुरुल गट अंकुश जगताप, हनुमंत पाटील (भाजपा), आष्टी गट राजेंद्र सर्जे (काँग्रेस), अजय डोंगरे (शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस), समाधान शेळके, बाळासो पाटील (भाजपा), लालासाहेब पाटील (अपक्ष) तसेच पोखरापूर पंचायत समिती गणासाठी समाधान खंदारे ( शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस), अतुल मोरे (काँग्रेस) बाबासाहेब गाडे, आदिनाथ कांबळे (भाजपा),सय्यद वरवडे प. स. गणातुन राहुल मोरे ( भाजपा), बाळासाहेब गायकवाड, विजय कोकाटे, संग्राम काकडे ( शरद पवार रा. काँ.), सुरेश शिवपूजे (काँग्रेस), चांगुना म्हाळनोर (राष्ट्रीय समाज पक्ष)शिरापूर सो. प.स.गणातून नीलम मसलकर (भाजपा) सायली चव्हाण (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष), टाकळी सिकंदर गणातून सुवर्णा सोनटक्के स्वाती गवळी (शिवसेना) अमोरीका कापसे (भाजपा), पेनुर गणातून संगीता वसेकर (शिवसेना ) वर्षाराणी वसेकर, अंजली आढेगावकर (भाजपा), घोडेश्वर गणातून संजय विभुते (राष्ट्रवादी काँग्रेस), सुलेमान तांबोळी (काँग्रेस) पांडुरंग सरवळे हनुमंत पाटील (भाजप) पृथ्वीराज पवार, महेश जाधव (शरदचंद्र पवार रा. काँ.) खंडाळी प.स. गणातून सतीश भोसले, अजित भोसले (भाजपा) आष्टी गणातून जयराम गुंड (भाजपा) आदींनी उमेदवारी दाखल केली.

# शेकाप व साळुंखे पाटील गट एकत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक सांगोला तालुक्यात शेतकरी कामगार पक्ष व दिपकआबा साळुंखे पाटील गट हे एकत्रित लढवणार असल्याची माहिती शेतकरी कामगार पक्षाचे सांगोल्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी मंगळवार दि.२० जानेवारी रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले, शेतकरी कामगार पक्ष व दिपकआबा साळुंखे पाटील यांची स्व.आ. गणपतरावजी देशमुख यांच्यापासून चालू असलेली परंपरागत ही आघाडी कायम राहणार असून दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांशी विचार विनिमय करून हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा परिषदसाठी ७ पैकी शेकाप ४ तर दिपकआबा साळुंखे पाटील गट ३ जिल्हा परिषद गट लढवणार आहेत. यावेळी माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील म्हणाले, सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सांगोला तालुका विकास आघाडी स्थापन करण्यात आली असून त्याचे अधिकृत रजिस्ट्रेशन करण्यात आले आहे. तसेच पंचायत समिती साठी शेतकरी कामगार पक्ष ९ तर दिपकआबा साळुंखे पाटील गट ५ ठिकाणी निवडणूक लढवणार आहे. यावेळी शेतकरी कामगार पक्ष व दिपकआबा साळुंखे पाटील गटाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# अखेर संजयमामा शिंदे यांच्याकडेच राष्ट्रवादीचे एबी फार्म

### नाट्यमय घडामोडीनंतर राष्ट्रवादी कॉँग्रेसचे एबी फॉँर्म शिंदे गटाकडे

### दोन दिवसाचा सस्पेन्स दुपारनंतर संपुष्ठात

### शिंदे घराण्यातील एकही उमेदवार नाही

**तभा वृत्तसेवा**
**कुर्डूवाडी, दि.२१ जानेवारी-**

जि.प., पं.स. निवडणूकीच्या आज अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी माढा तालुक्यातील करमाळा विधानसभा मतदारसंघातील ३६ गावच्या कुर्डू व भोसरे मतदार संघात राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या एबी फॉँर्मवरून नाट्यमय घडामोडी घडल्या. दोन दिवसांपासून एबी फार्म मोहीते -पाटील गटाकडे की शिंदे गटाकडे यावरून असलेला सस्पेन्स दुपारी अडीच वाजता संपुष्ठात आला.

माजी आ.संजयमामा शिंदे यांच्या उमेदवारांना एबी




फॉँम मिळाल्यानंतर चित्र स्पष्ट झाले. अचानक वरीष्ठ पातळीवरून एबी फॉर्म शिंदे गटात शहराध्यक्षाकरवी मिळाले. माढा तालुक्यातील ७ जि.प. गट व १४ पं.स.गणासाठी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस होता. सर्वच राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तोबा गर्दी केली होती. भाजप आणी राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी वाजतगाजत उमेदवारी अर्ज दाखल केले. माढा तालुक्यातील टेंभूर्णी, उपळाई,मोडनिंब, मानेगाव, पिंपळनेर, बेंबळे हे जि.प.गटातील व गणातील उमेदवारांनी अर्ज दाखल केले. भाजपातर्फे जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्याकडे सर्व एबी फॉँम आले होते. तर राष्ट्रवादी कॉँग्रेसचे खा.धैर्यशिल मोहिते पाटील यांच्याकडे सर्व सुत्रे असल्याने शिवतेजसिंह मोहीते पाटील हे फार्म घेवून आले होते. त्यांच्यासमवेत आ.अभिजीत पाटील होते. ख-या नाट्यमय घडामोडी तर माढा तालुक्यातील भोसरे व कुर्डू जि.प. व त्यातील कुर्डू, अकोले, भोसरे, रोपळे गणातील एबी फार्मवरूनच घडल्या. काल रात्रीपर्यंत मोहीते-पाटील गटाचे करमाळ्याचे राष्ट्रवादी कॉँग्रेस (शप) चे आ.नारायण पाटील यांनी भोसरे व कुर्डू गटातील उमेदवारीही जाहीर केल्या होत्या. आज सकाळी अकरा पर्यंत शिंदे गटाकडे फॉँर्म नव्हते. तातडीने संजयमामांनी बी प्लॅन केला. सर्वच उमेदवारांना एक अपक्ष व एक पक्षाचा फॉँर्म भरण्याच्या सुचना दिल्या. मोहीते पाटील गटाकडूनही घड्याळाचे एबी.फॉँर्म येत आहेत याची वाट पहात उमदवार थांबले होते. अचानक अडीच वाजता शिंदे गटाकडे राष्ट्रवादी कॉँग्रेसचे एबी फॉँर्म आले. शेवटी उध्दव सेना, शिंदे सेना, राष्ट्रवादी कॉं.शप गटाची युती झाल्याने आ.नारायण पाटील यांच्या उमेदवारांनी तुतारी घेणेच पसंत केले. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी करमाळ्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी पहावयास मिळाल्या. आता प्रचार आणि निकाल याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

### माढा भाजपात फुट

माढा तालुक्यातील जि.प.चे पाच व दहा गणाचे भाजपा पक्षाचे तिकीट वाटपाचे सर्व अधिकार रणजितसिंह शिंदे यांना होते.त्यांनी बेरजेचे राजकारण करत वरीष्ठांच्या सल्ल्याने भिमानगरची पं. स.ची उमेदवारी संजय पाटील भिमानगरकर यांना तर मानेगाव जि.प.ची उमेदवारी माजी मंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे पृथ्वीराज सांवंत यांना अंतीम क्षणी जाहीर केली. चांदजचे माजी जि.प.सदस्य शिवाजी पाटील व जामगावचे कुर्डूवाडी मार्केट कमिटीचे व्हा.चेअरमन सुहास पाटील यांनी बंडखोरी करत खा.धैर्यशिल मोहीते पाटील यांची भेट घेत राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये प्रवेश केला. मानेगाव जि.प.ची जामगावकर यांना तर भिमानगर पं.स.ची शिवाजी पाटील यांना उमेदवारी मिळाली.

### शिंदे घरातील उमेदवार नाहीच

१९९५ च्या पुर्वीपासून कुर्डू जि.प.गट हा माजी आ.शिंदे बंधूंचा बालेकील्ला आहे. याठीकाणी जनरल आरक्षण पडल्यास शिंदे घराण्यातील उमेदवार असतोच. मात्र यावेळी कुर्डू व अकोले जनरल असूनही एकही उमेदवार घरातील द्यायचा नाही असा पवित्रा संजयमामा शिंदे यांनी घेतला. या गटात आण्णा ढाणे व विक्रम शिंदे हे जि.प.साठी इच्छूक होते. धनराज शिंदे हे सुरवातीपासूनच सर्व प्रक्रीयेपासुन अलीप्त असल्याने त्यांनी इच्छा व्यक्तच केली नाही. शेवटी आण्णा ढाणे यांना उमेदवारी मिळाली.